**मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

**(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)**

जा.क्र.मुंमप्र.झोपुप्रा/प्रशासन/३७६/२०२६
दिनांक 16 SEP 2026

## दरपत्रक सूचना

मुंबई महानगर प्रदेश झोपडपपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे (प.) येथील मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे या कार्यालयात शिपाई यांना कार्यालयीन वेळेमध्ये अधिकाऱ्यांच्या दालनाजवळ बसण्याकरीता ३५ स्टूलांची खरेदी करण्यासाठी दरकरार करणेबाबत खालील अटी व शर्तीची पूर्तता व पात्रता धारण करणाऱ्या पुरवठा धारकांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**नियम, अटी व शर्ती (Terms and Conditions)**

१. दरपत्रक हे पुरवठादाराच्या अधिकृत लेटरहेडवर स्पष्ट अक्षरात, स्वाक्षरी आणि शिक्क्यासह असणे आवश्यक आहे.

२. दरपत्रक एका बंद पाकिटात सादर करावे. पाकिटावर "शिपायांसाठी स्टुल्स पुरविण्याबाबतचे दरपत्रक" असा स्पष्ट उल्लेख असावा.

३. पुरवठादाराकडे वैध GST नोंदणी आणि पॅन कार्ड (PAN Card) असणे आवश्यक आहे.

४. मुदतः दरपत्रक **दिनांक २५/०९/२०२६** रोजी **संध्याकाळी ५.००** वाजेपर्यंत या कार्यालयात समक्ष किंवा टपालाद्वारे पोहोचणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

**तांत्रिक बाबी (Technical Specifications)**

१. शासकीय वापरासाठी हे स्टुल्स उच्च दर्जाचे व टिकाऊ असणे अनिवार्य आहे. (स्टूल विथ बॅक सपोर्ट)

२. दरपत्रकात दिलेले दर हे सर्व करांसह (GST), वाहतूक खर्च, मालाची चढ-उतार आणि कार्यालयात आणून देण्याच्या खर्चासह (F.O.R. Destination) असावेत.

३. पुरवठा आणि वितरणकामाची मुदतः पुरवठा आदेश (Purchase Order) मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत सर्व स्टुल्सचा पुरवठा कार्यालयात करावा लागेल.

४. सर्व स्टुल्सचा पुरवठा झाल्यानंतर कार्यालयातील संबंधित समितीमार्फत त्यांची गुणवत्ता तपासली जाईल पुरवठा करतांना कोणतीही तोडफोड किंवा नुकसान झाल्यास पुरवठादाराला स्वखर्चाने ते स्टूल बदलून द्यावे लागतील.

५. कोणतीही उचल (Advance) दिली जाणार नाही.

**अतांत्रिक बाबी**

१. निविदा दर सादर करताना GST वगळून सादर करणे आवश्यक राहील.

२. पुरवठा आदेश मिळाल्यावर पुढील सात दिवसात अटी व शर्ती मान्य असल्याचे पत्र द्यावे लागेल.

३. एका निविदा धारकाने एकच निविदा सादर करावी व तसे प्रमाणपत्र द्यावे.

४. परिपूर्ण देयक सादर करण्याची जबाबदारी पुरवठा धारकाची राहील.

५. आपण देयेके पुरवठा झाल्यावर विनाविलंब खरेदी अधिकारी यांना सादर करावी. सदर देयकातून नियमानुसार TDS रकमा वसूल केल्या जातील.

६. देयक सादर करताना GST क्रमांकासह सादर करावे.

७. दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटिंग (गिरवणे), पांढरी शाई न लावणे तसेच, कोणती निविदा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार प्राधिकरणाने राखून ठेवले आहेत.

तरी, इच्छूक पुरवठाधारकांनी आपली दरपत्रके मुंबई महानगर प्रदेश झोपडपपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, मानपाडा ठाणे (प.), येथे **दि. २५/०९/२०२६ पर्यंत संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावीत.**

**सही/-**

**(कल्पना जगताप)**

**सचिव**

**मुंबई महानगर प्रदेश**

**झोपडपपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे**